# -: जाहीर नोटीस.:-

राज्य शासनाच्या सिंचन व इतर प्रकल्पांसाठी खाजगी क्षेत्रातील जमीन, खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याचे अनुषंगाने महसुल व वन विभाग, मंत्रालय मुंबई, शासन निर्णय दिनांक १२-०५-२०१५ व ३०-०९-२०१५ अन्वये मार्गदर्शक तत्वे निश्चित करण्यांत आलेली आहेत.तसेच शासन परिपत्रक क्र.एलक्युएन-०१/२०१७/ अ-२ दि.२५/०१/२०१७ अन्वये खाजगी क्षेत्रातील जमीन, खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घेण्याचे अनुषंगाने कार्यपध्दती विशद केलेली असून त्याचे (२)(ब) एक) अन्वये प्रस्तावाची जाहीर सूचना खालील प्रमाणे आहे.

| | |
|---|---|
| प्रस्तावाचे नांव | भूसंपादन प्रकरण क्रमांक ६७/२०१२-१३ मौजे भरोसा.(उर्वरित)ता.चिखली येथील जमिनीचे खाजगी वाटाघाटीव्दारे थेट खरेदी पध्दतीने ०१ भूधारकांचे क्षेत्र ००.०७ हे.आर. ताब्यात घेणे. |
| भूसंपादन अधिकारी | उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी बुलडाणा. |
| यंत्रणा | कार्यकारी अभियंता,खडकपूर्णा प्रकल्प विभाग,देऊळगांवराजा. |
| यंत्रणा उपविभाग | उपविभागीय अभियंता , खडकपूर्णा कालवे उविभाग क्र.२,चिखली. |
| संपादनाचे प्रयोजन | भरोसा ता.चिखली येथील खडकपूर्णा प्रकल्पाच्य उपसा सिंचन टप्पा क्र.३ शाखा कालव्यावरील लघु कालवा क्र.१ कामासाठी. |

भूसंपादन प्रकरण क्रमांक ६७/२०१२-१३,मौजे भरोसा. ता.चिखली येथील खाजगी वाटाघाटी व्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यात घ्यावयाच्या जमिनीचा गोषवारा

| अ.क्र. | भूधारकाचे नांव | गट क्रमांक | संपादीत क्षेत्र हे.आर. | वा झाडे,फळ झाडे, बांधकाम इत्यादी |
|---|---|---|---|---|
| १ | सतिष दगडू थुटटे. | ३५४ | ००.०७ | -- |
| एकूण. | | | ००.०७ | |

करीता उपरोक्त नमूद जमिनी बाबत हया जाहिर नोटीस व्दारे कळविण्यांत येत आहे की,

०१) उपरोक्त जमिन खाजगी वाटाघाटी व्दारे थेट खरेदी पध्दतीने ताब्यांत घेण्यांत येणार असल्याने सदर जमिनीचे मालकी हक्काबाबत काही बाद असल्यास, हिस्से वाटे इ.बाबत वाद, न्यायालर्यान खटला चालु असल्यांस हया जाहिर प्रगटना पासुन ०७ दिवसांत उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी बुलडाणा यांचे कार्यालयांत शासकीय कामकाजांचे दिवसांत दु.०२-०० वा.पावेतो लेखी आक्षेप कागदोपत्री पुराव्यासह तीन प्रतीत सादर करावेत.

०२) उपरोक्त नमूद ०१ नुसार विहित कालावधीत आलेला आक्षेपां बाबतच विचार करण्यांत येईल, विहित मुदती नंतर प्राप्त आक्षेपा बाबत विचार करण्यांत येणार नाही.

०३) सदर बाबत अंतिम निर्णय घेण्याचा अधिकार हा संबंधित भूसंपादन अधिकारी यांचा राहिल.

०४) उपरोक्त प्रस्तावाची फक्त संयुक्त मोजणी हया जाहिर प्रगटना पासुन ०७ दिवस पावेतो उपविभागीय अधिकारी तथा भूसंपादन अधिकारी बुलडाणा यांचे कार्यालयीन वेळेत व दिवशी सकाळी ११-०० ते दुपारी ०२-०० पावेतो पाहण्यासाठी उपलब्ध आहे.

दिनांक. /१२/२०१८.

उपविभागीय अधिकारी तथा
भूसंपादन अधिकारी बुलडाणा.



National Informatics Centre,Buldhana